मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र.१५३६/२०१७ व अन्य प्रकरणी दि.२३.०७.२०२६ रोजी पारित आदेशास अनुलक्षून छाननी समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक - एस-१०/२०२६/प्र.क्र.५००/वने-०३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १३ ऑगस्ट, २०२६.

वाचा :

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि.२३.०७.२०२६ रोजीचे आदेश.

प्रस्तावना :-

भारतीय वन अधिनियम, १९२७ व महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ मधील तरतूदी व त्यानुषंगाने पारित झालेल्या विविध आदेशाच्या आधारे काही जमिनींच्या महसूली अभिलेखात खाजगी वनासंदर्भात नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. सदर नोंदीविरोधात मा.उच्च न्यायालयात विविध याचिका दाखल झाल्या आहेत. सदर याचिकांपैकी १८४ प्रकरणात (रिट याचिका क्र.१५३६/२०१७ व अन्य) एकत्रित सुनावणी घेऊन मा.उच्च न्यायालयाने दि.२३/०७/२०२६ रोजी अंतीम आदेश पारित केले आहेत.

प्रस्तुत आदेशात मा.उच्च / सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी वेळोवेळी पारित केलेल्या विविध आदेशाचा ऊहापोह मा.उच्च न्यायालयाने करुन त्याआधारे दाखल प्रकरणांची वर्गवारी केली आहे. त्याचप्रमाणे सदर वर्गवारीनुसार महसूली अभिलेखांत घ्यावयाच्या नोंदी व सदर क्षेत्रावरील निर्बंध नमूद केली आहेत. खाजगी वनांच्या अनुषंगाने दाखल होत असलेल्या प्रकरणांची संख्या विचारात घेता तसेच मा.उच्च न्यायालयांचे कार्यबाहुल्य पहाता, खाजगी वनाच्या नोंदीमुळे उद्भवणाऱ्या प्रकरणांची तपासणी/छाननी करण्यासाठी शासनाव्दारे समिती गठीत करण्याबाबत मा.न्यायालयाने सुचविले आहे.

याअनुषंगाने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशातील संबंधित परिच्छेद संक्षिप्तस्वरुपात खालीलप्रमाणे उध्दृत करण्यात येत आहे -

. . . 107 To make things simple and effortless, we expect the State Government to constitute a Committee to scrutinize all such cases which according to the State Government involve the issue of 'Private Forest' under the Act of 1975, covering the aspect of vesting as well as restoration of the land and before the Petitioners approach this Court, we expect the Committee under the aegis of an Officer not lower than the rank of the Deputy Conservator of Forest to scrutinize the matters.

महसूली अभिलेखात घेण्यात आलेल्या खाजगी वनाच्या नोंदीमुळे वारंवार उद्भवणारी प्रकरणे तसेच मा.उच्च न्यायालयाच्या प्रस्तुत आदेशातील निर्देशांच्या आधारे विवादीत जमिनीच्या महसूली अभिलेखातील नोंदींच्या अनुषंगाने प्रकरणांची छानननी करण्यासाठी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महसूली अभिलेखातील खाजगी वनाच्या नोंदींच्या विरोधात मा.उच्च न्यायालयात प्रकरण दाखल होण्यापूर्वी अशा प्रकरणाची छानननी / तपासणी करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या दि.२३/०७/२०२६ च्या आदेशास अनुलक्षून खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

अ.क्र.	सदस्यांची नावे	पदनाम
१	प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर	अध्यक्ष
२	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), नागपूर	सदस्य
३	उप वनसंरक्षक, कार्य आयोजना पश्चिम, पुणे	सदस्य सचिव
४	आवश्यकतेनुसार तज्ञ व्यक्ती/ यंत्रणा, विधी सल्लागार, शासकीय अधिकारी यांना अध्यक्ष निमंत्रित करतील.	निमंत्रित सदस्य

२. समितीची कार्यकक्षा :

१) भारतीय वन अधिनियम, १९२७ व महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ मधील तरतूदी व त्यासंदर्भाने पारित झालेल्या विविध आदेशाच्या आधारे जमिनींच्या महसूली अभिलेखात खाजगी वनासंदर्भात नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. सदर नोंदीच्या अनुषंगाने उद्भवणारी प्रकरणे / प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाच्या दि. २३.०७.२०२६ च्या आदेशाच्या कार्यकक्षेत राहून प्रकरणनिहाय छानननी करणे.

२) तपासणीअंती समितीने शिफारशींसह प्रकरण शासनास आदेशार्थ सादर करणे.

३. कार्यपध्दती :

१) महसूली अभिलेखातील खाजगी वनाच्या नोंदीबाबत आक्षेप असणाऱ्या खातेदाराने त्याबाबतच्या उचित कागदपत्रासह निवेदन संबंधित उप वनसंरक्षक यांच्या कार्यालयास सादर करावे.

२) उप वनसंरक्षक यांनी ८ दिवसांच्या मर्यादेत प्राप्त झालेले निवेदन छानननी समितीस अग्रेषित करावे.

३) उप वनसंरक्षक यांनी सदर निवेदनाच्या अनुषंगाने विभागाकडील उपलब्ध अभिलेखांच्या आधारे वन विभागाचे लेखी म्हणणे / वस्तुस्थिती समितीपुढे सादर करावी.

४) छानननी समितीने प्राप्त निवेदनातील विनंती, वन विभागाकडून प्राप्त वस्तुस्थिती, आवश्यकतेनुसार महसूल विभागाच्या संबंधित उप विभागीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेतलेल्या माहितीच्या आधारे प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या दि.२३/०७/२०२६ च्या आदेशाच्या कार्यकक्षेत राहून छानननी करावी. व छानननीअंती प्रकरण शिफारशींसह शासनाकडे आदेशार्थ सादर करावे.

५) समितीच्या शिफारशींवर शासन स्तरावरुन निर्णय घेण्यात येईल.

६) छाननी समितीने १५ दिवसांत किमान एक वेळा बैठक आयोजित होण्याची दक्षता घ्यावी.
७) छाननी समितीस आवश्यकतेनुसार अतिरिक्त सदस्यांची नियुक्ती करण्याची मुभा असेल.

४. प्रस्तुत छाननी समितीचा कार्यकाळ सद्य:स्थितीत एक वर्षाचा राहील. कामकाजाचे स्वरुप विचारात घेऊन आवश्यकतेनुसार समितीच्या कार्यकाळाबाबत यथावकाश निर्णय घेण्यात येईल. त्याचप्रमाणे समितीच्या संरचनेत आवश्यकतेनुसार शासनाद्वारे बदल करण्यात येतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०८१४१३११२७४२४० आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JITENDRA S RAMGAOKAR

Digitally signed by JITENDRA S RAMGAOKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Dept,
2.5.4.20=DA1BD25BE62F91C7B60749717D63394F115854B1B30C0D7CDA850348D6A12577, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=067F696C19CDAEAD50B2E37C6C5A94DB09F968C45E35C16617050C2A9D057202, cn=JITENDRA S RAMGAOKAR
Date: 2026.08.14 13:12:27 +05'30'

(डॉ.जितेंद्र रामगावकर)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत :

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
८) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर
९) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुर्व / पश्चिम.
१०) मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (प्रादेशिक) (सर्व).
११) मुख्य वनसंरक्षक (भूमी अभिलेख), नागपूर.
१२) जिल्हाधिकारी (सर्व).
१३) उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) (सर्व)
१४) निवडनस्ती.